मराठी

जुलै-ऑगस्ट २०११

# चैतन्य लहरी





ज्या मनुष्यामध्ये सहजयोगाचे कार्य करायची इच्छा आहे,
ज्या मनुष्यामध्ये दीप बनण्याचे सामर्थ्य आहे, अशाच लोकांची
परमेश्वर मदत करेल आणि असेच दीप जळतील
ज्यामुळे या संपूर्ण विश्वात प्रकाश पसरेल.

अमृतवाणी, निर्मला योग

# या अंकात


* गुरू पूजा ...४
* विशुद्धी चक्र ...२०




**कृपया लक्ष द्या :**

२०१२ च्या सर्व अंकांची नोंदणी सप्टेंबर २०११ ला सुरू होऊन ३० नोव्हेंबर २०११ ला समाप्त होईल.

# गुरु पूजा



# १९८१

गुरुपूजा का आयोजित केली जाते ?

प्रत्येक शिष्याने आपल्या गुरूची पूजा करणे महत्त्वाचे आहे हे आपण जाणून घ्यावे. परंतु गुरू खरा असावा. शिष्याचा फायदा घेणारा, परमेश्वराने ज्याला अंगीकृत केले नाही असा नसावा. परमेश्वराच्या नियमांची तुम्हाला दीक्षा दिली असल्यामुळे व मानवाचे धर्म काय आहेत हे तुम्हाला सांगितले असल्यामुळे पूजेचे आयोजन केले जाते.

त्याच्यासाठी वास्तविक तुम्हाला गुरूची आवश्यकता नसते, पुस्तके वाचून परमेश्वराचे नियम काय आहेत ते शिकता येत. परंतु तुम्ही त्या नियमांचे पालन करीत आहात इकडे गुरूला लक्ष द्यायचे असते हे नियम आचरणात आणायचे असतात. स्वत:च्या जीवनात उतरवायचे असतात, हे अवघड असते. गुरूंच्या शिवाय, म्हणजेच तुम्हाला सुधारणाऱ्या शक्तीच्याशिवाय, परमेश्वराच्या नियमांचे पालन करणे फार अवघड असते आणि हे अंतर जो गुरू स्वत: पूर्ण आहे तोच फक्त भरू शकतो.

आज पौर्णिमा आहे. याचा अर्थ पूर्ण चंद्र. या नियमांच्याविषयी बोलण्यासाठी व आपल्या शिष्यांना हे नियम समजून आत्मसात करता येतील इतक्या पातळीपर्यंत उन्नत करण्यासाठी गुरू हा संपूर्ण व्यक्तिमत्त्व असावा. हे अंतर भरून काढण्यासाठी गुरू असतो व त्याच्यासाठी गुरू उच्च गुणवत्तेचा, आत्मसाक्षात्कारी व उच्च स्थितीपर्यंत उत्क्रांत झालेला असावा लागतो.

गुरू हा तपस्वी अथवा जंगलात राहणारा असला पाहिजे असे नाही. तो सर्व साधारण, कुटुंबवत्सल असू शकतो, राजा असू शकतो.

बाह्यातील आपले जीवन कसेही असले तरी त्यामुळे काही बिघडत नाही. तुमचे स्थान, म्हणजे जगातील तथाकथित स्थान, काहीही असले तरी जोपर्यंत तुम्ही ईश्वराचे नियम आत्मसात केले आहेत तोपर्यंत त्या स्थानामध्ये काही फरक पडत नाही.

मी परत सांगते, हे ईश्वराचे नियम तुम्ही आत्मसात केले पाहिजेत. हे नियम कोणते आहेत ते आपण आता पाहू.

पहिला नियम हा आहे की,'तुम्ही कोणासही अपाय अथवा दुखापत करू शकत नाही.' प्राणी हे दुसऱ्यांना हेतु पुरस्सर दुखापत करीत नाही. तुम्ही सापाच्या जवळ गेलात तर चावेल, विंचू असल्यास तो त्याचे विष तुमच्या शरीरात सोडेल, माणसांनी कोणासही इजा करायची नाही. ते सुधारू शकतात, पण इजा नाही. परंतु हे इजा न करण्याचे तत्त्व इतक्या टोकापर्यंत नेले जाते की ते वास्तवापासून दूर

असते. उदा.असे सांगितले गेले की दुसऱ्यांना इजा करायची नाही, त्यावेळी लोक म्हणू लागले की ''डास व ढेकूण यांना आम्ही इजा करणार नाही, त्यांना मारणार नाही.'' एका धर्माचे अनुयायी डास व ढेकणांचा सांभाळ करतात. हा विचित्रपणा झाला. एखादी गोष्ट विक्षिप्तपणाची होईपर्यंत ताणणे वास्तव असू शकत नाही.

सर्वात प्रथमत: परमेश्वराप्रत जाणाऱ्या मार्गावर चालणाऱ्या कोणासही, आत्मसाक्षात्कारी जीवास त्रास देऊ नये. त्याच्यामध्ये काही चुका असतील, त्याला सुधारण्याची आवश्यकता असेल, अद्याप कोणीच परिपूर्ण नाही, म्हणून कोणासही त्रास देऊ नका. नेहमीच मदत करण्याचा प्रयत्न करा.

दुसरे, जो कोणी खरा साधक असेल, तो चुकला असेल व गुरूंच्याकडे गेला असेल, त्याने चुकीच्या गोष्टी केल्या असतील पण त्यांच्यासाठी तुमच्याजवळ सद्‌भावना असाव्यात कारण तुम्ही सुद्धा केव्हा केव्हा चुकीच्या मार्गावर जात होता. या पूर्वी तुम्हाला सुद्धा चुकीचे मार्गदर्शन मिळाले होते. तेव्हा सहानुभूती असू द्या. म्हणून एक प्रकारे तुम्ही चुका केल्या ते चांगले झाले. कारण अशा लोकांच्यासाठी तुम्हाला अधिक सहानुभूती वाटेल.

**चैतन्य लहरींच्या जाणिवेतून हे सत्य आहे हे आपण पाहू शकलो.**

शिवाय माणसांना कोणत्याही प्रकारे तुम्ही शारीरिक इजा करायची नाही किंवा केवळ त्रास देण्याच्या हेतूने त्यांच्या भावना दुखवू नये. त्यांना सुधारण्याचा हेतू असल्यास ठीक आहे. (नंतर हीथ्रो विमानतळावर श्री माताजींनी परत सांगितले की आपण कोणासही अपाय करायचा नाही.)

दुसरा नियम असा की, तुम्ही स्वत:च्या पायावर उभे रहायला हवे आणि हे समजून घ्यावे की या ठिकाणी तुम्ही सत्याशी एकरूप झाला आहात. तुम्ही सत्याचे साक्षीदार आहात. तुम्ही सत्य पाहिले आहे, सत्य काय आहे ते तुम्ही जाणता व असत्याशी तुम्ही तडजोड करू शकत नाही. तुम्हाला ते शक्य नाही. त्याच्यासाठी कोणासही त्रास देण्याची आवश्यकता नाही. फक्त तुम्हाला ते लोकांना सांगावयाचे आहे. तुम्हाला उभे राहून लोकांना सांगायचे आहे की तुम्ही सत्य पाहिले आहे आणि हे सत्य आहे व सत्याशी तुम्हाला तादात्म्य मिळवायचे आहे. त्याच्यामुळे लोकांना तुमच्यातील सत्याचा प्रकाश दिसेल व ते त्यांचा स्वीकार करतील.

स्वत:ची परीक्षा करा. दुसऱ्यांना सांगण्यासाठी तुम्ही सत्यमय व्हायचे आहे आणि आपण हे सत्य पाहिले आहे आणि हे परमेश्वराचे नियम आहेत व ते असे कार्यान्वित होतात. चैतन्य लहरींच्या जाणिवेतून हे सत्य आहे हे आपण पाहू शकलो. पण याच्याविषयी पूर्ण आत्मविश्वास ठेवा. पण त्याच्यासाठी स्वत:ची सर्वात प्रथम पूर्ण परीक्षा करा. अन्यथा तुम्ही वाईट शक्तीच्या हातातील खेळणे व्हाल. सहजयोग करण्यास सुरुवात केल्यावर अनेक सहजयोग्यांचे असे होते. त्यांना चैतन्य लहरी जाणवायला हव्या. म्हणून काळजी घ्या. तुम्ही दुसरे काही नाही तर सत्य सांगत आहात आणि तुम्ही सत्य

संपूर्णपणे अनुभवले आहे याची खात्री करा. ज्यांना चैतन्य लहरी जाणवल्या नसतील त्यांनी सहजयोगाबद्दल सांगू नये. त्यांना अधिकार नाही. त्यांना चैतन्य लहरी मिळायला हव्यात. पूर्णपणे त्यांनी चैतन्य लहरी आत्मसात करायला हव्या आणि मग ते म्हणू शकतात की आम्हाला जाणीव झाली आहे. आधुनिक काळात सहजयोग्यांना हे फार महत्त्वाचे कार्य करायचे आहे की त्यांनी जाहीररीत्या लोकांना सांगावे की त्यांना सत्य मिळाले आहे. याबाबतीत फार कमकुवतपणा आहे, तुम्हाला ज्या प्रकारे आवडेल त्या प्रकारे तुम्ही सत्याला जाहीर करा. तुम्हाला पुस्तके लिहिता येतील, तुमच्या मित्रांशी, नातेवाईकांशी बोलून त्यांना सांगावे की तुम्ही परमेश्वरी राज्यात प्रवेश केला आहे, तुम्हाला परमेश्वराच्या कृपेने आशीर्वाद प्राप्त झाले आहेत हे सत्य आहे. आता तुम्ही हे सत्य प्रकट सांगू शकता की तुम्ही आत्मसाक्षात्कारी जीव आहात, सर्वत्र वास करत असलेल्या ईश्वरी शक्तीची तुम्हाला जाणीव झाली आहे, तुम्ही दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार देऊ शकता आणि सत्याचा स्वीकार करून तुम्ही सत्यामध्ये काही भर घालत नाही तर स्वत:ला सुशोभित करता.

सत्याचा आनंद घेण्यास धैर्य लागते. काही वेळेस लोक तुमची टवाळी करतील, हसतील, कदाचित त्रासही देतील परंतु याची तुम्हाला काळजी नसावी, कारण तुमचे नाते परमेश्वरी नियमांशी, परमेश्वराच्या कृपेशी आहे. तुम्ही त्यांच्याशी संलग्न झाल्यावर इतरांच्या बद्दल आणि त्यांना काय म्हणायचे आहे याची फिकीर करू नये. तुम्ही उभे राहून स्वत:ला सत्याने सुशोभित करायला हवे.

**तुम्ही निरासक्ती विकसित केल्याशिवाय तुम्हाला संपूर्णपणे चैतन्य लहरी मिळत नाहीत.**

गुरू होण्यासाठी तिसरी गोष्ट सहजयोग्यास करायला हवी, ती म्हणजे निरासक्ती विकसित करायला हवी. हळूहळू तुम्ही ती वाढविताच. कारण तुमच्या लक्षात येते की तुम्ही निरासक्ती विकसित केल्याशिवाय तुम्हाला संपूर्णपणे चैतन्य लहरी मिळत नाहीत. सर्व प्रकारची निरासक्ती वाढवायला हवी, याचा अर्थ जीवनातील तुमचे प्राधान्य (प्रायॉरिटीज) बदलतात. एकदा तुमच्या आत्म्यावर तुमचे चित्त दृढ झाले की कमी महत्त्वाच्या गोष्टींवरील पकड आपोआप कमी होऊ लागते. उदा.तुमचे आई, वडील, बहीण वगैरे. भारतात ही समस्या मोठी आहे.

इथे तुम्ही जास्तच निरासक्त आहात पण भारतात, स्वत:च्या मुलांच्यात लोक फारच गुंतलेले असतात,''हा माझा मुलगा'' जसे काही दुसऱ्यांची मुले पोरकी आहेत व फक्त तुमची मुले मुलीच तेवढी खरी मुले आहेत. ही माझी मुलगी, माझ्या मुलाकरता मला हे करायलाच हवे. माझे वडील, माझी आई. दोन प्रकारच्या आसक्ती असतात. एक मोहामध्ये गुंतल्यामुळे, तुम्हाला त्यांच्यासाठी हे करावेसे वाटते, ते करायचे असते, त्यांना प्रॉपर्टी द्यायची असते, त्यांचा विमा उतरवायचा असतो वगैरे.

दुसऱ्या प्रकारची आसक्ती आपल्याकडे (लंडनमध्ये) असते तशी. तुम्ही तुमच्या वडिलांचा द्वेष करता, आईचा द्वेष करता, प्रत्येकाचा द्वेष करता, दोन्ही गोष्टी सारख्याच

म्हणून निरासक्ती वाढवायला हवी. निरासक्ती म्हणजे तुम्हीच तुमचे वडील आहात, तुम्हीच तुमची आई आहात, तुम्हीच सर्व काही आहात, तुम्हाला तुमचा आत्माच सर्व काही आहे.



तुमच्या आत्म्याचा आनंद मिळवायला हवा मग त्याच्यातून निरासक्ती येते. मग त्या लोकांच्यासाठी तुम्ही काही तरी चांगले करू शकता. कारण त्यांच्यापासून लांब होऊनच त्यांच्या विषयी सर्व दृष्टिपथात येते आणि त्यांच्यासाठी काय करावे हे ही समजते. लोकांना विक्षिप्त गोष्टींची आसक्ती असते. माणूस कोणत्या तरी गोष्टीच्या मागे नेहमीच वेड्यासारखा असतो मग ते काही असू शकते. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की फक्त एकच वेड असावे ते म्हणजे तुमच्या आत्म्यांमध्ये प्रस्थापित व्हायचे, अगदी निराबाधितपणे, प्रस्थापित व्हायचे, इतर सर्व प्रकारचे ध्यास आपोआप नाहीसे होतील. कारण आत्मा सर्वात अधिक आनंददायक आहे. सर्वात अधिक पोषक गोष्ट आहे, सर्वात अधिक सुंदर गोष्ट आहे.

म्हणून इतर सर्व गोष्टी गळून पडतात आणि तुम्ही जो सर्व आनंदाचा उगम आहे, त्याचा आनंद घेता.

तुम्ही आत्म्याशी आसक्त व्हा आणि निरासक्ती आपोआप कार्यान्वित होते. काही वेळेस, निरासक्ती म्हणजे इतर लोकांशी शुष्कपणे वागण्याचा परवाना आहे असे समजले जाते, ते अगदी चुकीचे आहे. प्रत्येक सुंदर गोष्ट वाईट करणे हा माणसाचा एक गुणधर्म आहे. वास्तविक जी व्यक्ती निरासक्त असते ती अतिशय सुंदर असते, अतिशय प्रेमळ असते जणू काही मूर्तिमंत प्रेमच. फुले पहा ती विरक्त असतात. ती उद्या जिवित राहणार नसतात. मरणार असतात. पण प्रत्येक क्षण तुम्हाला ती सुगंध देत असतात. झाडे कशालाच चिकटून रहात नाहीत. उद्या ती मरणार आहेत परंतु काही बिघडत नाही. त्यांच्याजवळ कोणी गेला तर ते त्याला सावली देतील, फळे देतील.

आसक्ती म्हणजे प्रेमाचा मृत्यू. प्रेमाच मृत्यू म्हणजे आसक्ती. उदा.वृक्षांचे घ्या. त्यांच्यामधील जीवनरस वर चढत जातो. आवश्यक त्या सर्व भागांमध्ये जातो. सर्व फुलांमध्ये, सर्व फळांमध्ये जाऊन पृथ्वीमातेमध्ये परत जातो. तो कशाला चिकटून राहात नाही. समजा जीवन रस जाऊन एकाच फळाला चिकटून राहिला तर काय होईल? ते फळ मरेल आणि वृक्षही मरेल, निरासक्ती, तुमचे प्रेम पसरविते, तुमच्या प्रेमाला प्रवाहित करते.

आता वस्तूंच्या बाबतीत - वस्तूंच्या मागे भावना नसतात तोपर्यंत त्यांना कोणतीही किंमत नसते. उदा. आज मी जी साडी नेसली आहे ती गुरूपौर्णिमेसाठी खरेदी केली होती. तेव्हा मी म्हणाले की तुमचा आग्रह असेल तर मी घेईन. परंतु मी आता ती नेसले. कारण मला सांगायचे होते की गुरूपौर्णिमा पूजेचे दिवशी श्री



माताजींना फिकट रंगाची साडी नेसायला आवडेल म्हणून इतक्या भक्तीने आणि प्रेमाने ही साडी विकत घेतली अगदी पांढऱ्या शुभ्र रंगाची, रेशमी साडी. संपूर्ण निरासक्ती. परंतु पांढऱ्या रंगात सर्व रंगाचे मिश्रण असते, तेव्हाच तो पांढरा रंग होतो. इतके संतुलन आणि एकात्मता असते. तुम्ही अधिक शुभ्र, बर्फापेक्षाही शुभ्र व्हायला हवे.

निरासक्ती म्हणजे पावित्र्य, अबोधिता. अबोधिता असा प्रकाश आहे की तो प्रकाश जे काही गलिच्छ आहे त्याच्यापासून तुम्हाला अंध बनवितो. एखादी व्यक्ती तुमच्याकडे चोरी करण्याकरिता येते. एखादी व्यक्ती वाईट हेतूने तुमच्याकडे आली तरी तुम्हाला ते समजणार पण नाही. तुम्ही म्हणाल 'या. या, काय पाहिजे तुम्हाला?' तुम्ही त्याला चहा वगैरे द्याल. मग तो तुम्हाला म्हणेल मी तुम्हाला लुटण्यासाठी आलो आहे. तुम्ही उत्तर द्याल हवं असेल ते लुटा, तेव्हा तुम्हाला तो अजिबात लुटणार नाही. ही अबोधिता आपल्याला विकसित करायला हवी ती फक्त निरासक्ती मधून.

निरासक्ती चित्ताची असते. तुमचे चित्त कशातही गुंतू देऊ नका. अगदी कोणत्याही कर्मकांडामध्येही नको. समजा आम्ही श्री माताजींचे चरण धुतले नाहीत. ठीक आहे. काही बिघडले नाही. तुमचे माझ्यावर प्रेम आहे. काही चुका झाल्या असतील. त्याने काय बिघडले? ॲबस्ट्रॅक्ट पातळीवर पाहिले, तर प्रेम आहे. हे एक पाऊल पुढे आहे इतकेच. जसे एखादा माणूस फार जलद पळाला आणि माझ्याजवळ पोहोचायच्या आत तो पडला आणि म्हणाला, ''श्री माताजी, क्षमा असावी आपल्या जवळ येण्यापूर्वीच मी पडलो. मी पडायला नको होते, परंतु श्री माताजी पहा आपल्या पुढे मी कसा साष्टांग नमस्कार घातला आहे?'' हे संपूर्ण काव्यच आहे. निरासक्ती.

कोणालाही इजा करायची नाही. अहिंसा, कोणाचीही हत्या करायची नाही.

तेव्हा गुरू होण्यासाठी आपल्याला ही निरासक्ती विकसित करायला हवी आणि निरासक्ती ह्याचा अर्थ संन्यास अथवा त्याच्यासारखे दुसरे काही नव्हे. काही वेळेस लोकांना कळण्यासाठी म्हणून आपल्याला असे कपडे घालावे लागतात. कारण थोड्या काळामध्ये तुम्हाला कार्य करायचे असेल तर तुम्हाला ख्रिस्तांसारखे अथवा आदि शंकराचार्यांप्रमाणे अशा प्रकारे तीव्रतेने वागणे ठेवावे लागते. या सर्व लोकांना फारच थोडा जीवन काळ मिळाला. त्या थोड्या जीवनामध्ये त्यांना इतके प्रचंड कार्य साध्य करायचे होते की त्यांना अडचणी टाळण्यासाठी लष्करी पोशाख घालावा लागला. दुसऱ्यावर प्रभाव पाडण्यासाठी नाही. आज काल केवळ दुसऱ्यांना प्रभावित करण्यासाठी, ते निरासक्त आहेत असा प्रभाव पाडण्यासाठी लोक असे करतात. मात्र त्यांच्या अगदी विरोधात वागतात.

म्हणून प्रथम आपण हे समजायला हवे की कोणालाही इजा करायची नाही. अहिंसा, कोणाचीही हत्या करायची नाही. याचा अर्थ असा नाही की तुम्ही मांसाहारी नसावे. तो वेडेपणा आहे. अर्थात तुम्ही खाण्याच्याच मागे लागू नये यात संशय नाही. तुम्ही कोणाचीही हत्या करू नये. याचा अर्थ माणसाची हत्या करू नये. ''दाऊ शॅल नॉट कील'' तेव्हा पहिली गोष्ट ही की कोणासही अपाय करायचा नाही.

दुसरे म्हणजे तुम्हाला सत्याचा लाभ झाला आहे आणि तुम्हाला सत्याला पुष्टी द्यायची आहे. तिसरे म्हणजे निरासक्ती. जसे मी तुम्हाला निरासक्ती बद्दल सांगितले आहे. कोणाच्याही एका माणसाच्या लोभात रहायचे नाही मग तो नातेवाईक असो किंवा

आणखी कोणी असो. कोणाचाही द्वेष करायचा नाही. ती सर्वात वाईट आसक्ती आहे. मला द्वेष वाटतो हे शब्द सहजयोग्याच्या तोंडून गेले पाहिजेत. हा नियम आहे. याला दंडक म्हणतात. तुम्ही कोणाचाही द्वेष करू शकत नाही. अगदी राक्षसांचा सुद्धा. त्यांचा द्वेष करू नये हे चांगले. त्यांना संधी द्या.

आता परमेश्वराचा चौथा नियम म्हणजे नैतिक जीवनक्रम ठेवणे. हे ईश्वरी नियम गुरूंनी दिले होते. सॉक्रेटीस, मोझेस, अब्राहम, दत्तात्रेय, जनक, महंमद साहेब यांच्यापासून ते शंभर वर्षापूर्वी साईनाथ होते. या सर्वांनी हेच सांगितले आहे की तुम्ही नैतिक जीवन जगायला हवे. तुम्ही लग्न करू नका असे कोणीच सांगितले नाही अथवा तुमच्या पत्नीशी बोलू नका किंवा तिच्याशी काहीच संबंध ठेवू नका असे काहीच सांगितले नाही. हा सर्व मूर्खपणा आहे. जीवनक्रम नैतिकतेचा असावा. तुम्ही तरुण व अविवाहित असता त्यावेळी तुमची दृष्टी जमिनीकडे असावी. पृथ्वीमाता तुम्हाला अबोधिता देते.

**परमेश्वराचा चौथा नियम म्हणजे नैतिक जीवनक्रम ठेवणे ..........**

बहुतेक सर्व गोंधळ आणि समस्या विशेषत: पाश्चात्त्य जीवनात निर्माण होण्याचे कारण हे आहे की त्यांनी नितिमत्ता समुद्रात फेकून दिली आहे आणि समाजाचा आधार म्हणून नितिमत्तेचा स्वीकार करण्यास त्यांना आता अवघड जात आहे. हे संपूर्ण माघारी परतणे आहे. परंतु तुम्हाला हे कळायला हवे. तुम्हाला चक्र उलट फिरवायला हवे. समाजाच्या सुरुवातीस हे पवित्र संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून अनेक गोष्टी केल्या गेल्या. काही नियम असे आहेत की ते रसायन शास्त्राच्या नियमाप्रमाणे आहेत. त्या मानवी नियमांना आपण समजून घेतले पाहिजे. त्यांचे परस्परांमधील संबंध, त्या नात्यामधील आनंद, त्या नात्यामधील पावित्र्य इ.लक्षात घेतले पाहिजे. नितिमान जीवन जगावे. पती आणि पत्नी यांच्या नात्यातील पावित्र्य लक्षात घेतले पाहिजे, मगच तुमचे वैवाहिक जीवन फारच सुखाचे होऊ शकते. तो आधार आहे. ख्रिस्तांनी सांगितले आहे की, ''तुम्ही स्वैराचार करणार नाही.'' आधुनिक लोक त्यांच्या मेंदूचा याच्यासाठी उपयोग करतील हे कदाचित त्यांना ज्ञात असावे. ते म्हणाले होते,''तुमची दृष्टीसुद्धा स्वैराचारी नसावी.'' त्या काळामध्ये विचार करा. किती महान दृष्टी होती! मी भारतात होते. त्यावेळी माझ्या हे लक्षात आले नाही. याचा अर्थ काय आहे ते मला इथे आल्यावर समजू शकले. हे दृष्टीस झपाटले जाणे आहे. हे वागणे अतिशय नीरस व निरुपयोगी असते. चित्ताचा पूर्णपणे अपव्यय होतो. कोणताही भारदस्तपणा नसतो. दृष्टी स्थिर असावी.

स्थिर दृष्टी असावी. एखाद्या माणसाकडे तुम्ही सावकाश पहाल तर त्याला तुमच्यातील सहजयोग लक्षात यायला हवा. प्रेमाने, आदराने व भारदस्तपणे, दुसऱ्याकडे टक लावून न पहाता ते म्हणजे भुताच्या हातचे बाहुले बनणे आहे. संपूर्ण समाजच झपाटल्यासारखा आहे. मला वाटते सर्व सैतानी शक्ती मोकाट सुटल्या आहेत.

आणि जसे लोक झपाटले गेले आहेत त्यामधून त्यांना काहीच दिसत नाही. चित्ताची काळजी घ्यायला हवी. ती फार महत्त्वाची गोष्ट आहे कारण जे प्रकाशित होणार आहे ते

चित्त आहे.

म्हणून नैतिकता काय आहे ते शिकायला हवे. लोकांना हवे तर तुमच्यावर हसू देत की तुम्ही 'गुडी, गुडी' (सद्वर्तनी साधे लोक) आहात. आपण सत्शील आहोत. त्याचा आपल्याला अभिमान आहे, लाज वाटत नाही. धार्मिकतेचा हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. याचे अवलंबन करणार नाहीत, त्यांच्या चैतन्य लहरी ते जलद गमावून बसतील.

नंतर गुरूने संग्रह करायचा नाही. त्याच्याजवळ कशाचाही जास्त साठा नसावा. त्याच्याजवळ काही असेलच तर ते त्यांच्या गरजेपुरते असावे. गुरूने त्याच्या जवळच्या वस्तू दुसऱ्यास द्याव्यात. आर्थिक लाभासाठी पोस्टाची तिकिटे अथवा तसे काही जमवू नये. ज्या काही उपयोगी व सुंदर गोष्टी असतील, दुसऱ्यांच्या दृष्टीला सुख व आनंददायी असतील अशा गोष्टी जमवाव्यात. ज्या गोष्टी त्याच्या जीवनाचे प्रतीक असतील तो धार्मिक आहे हे दर्शवतील. अशा गोष्टी त्याच्याजवळ असाव्यात. ज्या अधार्मिकतेच्या, अधार्मिक जीवनाच्या प्रतीक आहेत अशा गोष्टी त्याच्याजवळ नसाव्यात. त्याच्या जवळील अथवा त्याच्या अंगावरील प्रत्येक गोष्ट त्याच्या धार्मिकतेची प्रतिनिधी असावी.

अपवित्र गोष्टी ज्याच्या चैतन्य लहरी वाईट आहेत अशा गोष्टी आपल्या जवळ बाळगू नये. तुमच्या जवळ जे आहे ते कुणाला देता येईल याचा विचार तुम्ही करावा.

तेव्हा याचा अर्थ तुमचे औदार्य दर्शविण्यासाठी तुमच्याजवळ वस्तूंचा संग्रह असावा. सहजयोग्याने सागरासारखे उदार असावे. कृपण सहजयोगी - त्याची मी कल्पनाच करू शकत नाही. म्हणजे प्रकाशाबरोबर अंधाराचे मिश्रण करणे. सहजयोगात कृपणतेला परवानगी नाही.

ज्याचे मन, मी किती पैसा वाचवू शकतो, किती श्रम वाचवू शकतो इकडे जाते. श्रम वाचविण्याचे, पैसा वाचविण्याचे अनेक मार्ग आहेत अथवा दुसऱ्यांना फसविण्याचे किंवा लहान लहान गोष्टींमधून इकडून तिकडून पैसा मिळविण्याचे मार्ग आहेत. या सर्व गोष्टी सहज योगाच्या विरोधात आहेत. या तुम्हाला खाली ओढतील. तुमच्या औदार्याचा आनंद घ्या. किती वेळा मी तुम्हाला औदार्याबद्दल सांगितले असेल.



ज्या प्रकारे तुम्ही दुसऱ्यांना देता त्याच्या शिवाय त्यामधील भावनेची बाजू फार सुंदर आहे. तुम्हाला कल्पना करता येणार नाही. एका महिलेची तिचे लग्न झाल्यावर लंडन येथे तीस वर्षांनी माझी अचानक भेट झाली. ती म्हणाली,''काय योगायोग आहे.'' मी विचारले का? तिने सांगितले,''मी जे मोत्याचे गंठण घातले आहे ते तुम्ही मला लग्नात दिले होते. आज मी ते घातले आहे आणि तुमची भेट व्हावी.'' त्या भेटीनंतर सगळा एकदम बदल झाला. अशा तऱ्हेने तुम्ही लहान गोष्टी सुद्धा



देता. सहजयोगामध्ये ही देण्याची महान कला आपल्याला शिकायला हवी. भौतिक प्रकारच्या गोष्टींचा त्याग करावा. जसे तुम्ही कोणाच्या वाढदिवसाच्या दिवशी जाता आणि आभार प्रदर्शक कार्ड पाठविता. ज्याची महानता अधिक खोलवर जाणवेल अशी गोष्ट करावी. पाहू या. तुम्ही तुमचे प्रेम दर्शविणारी प्रतीके कशी विकसित करता ते. जेव्हा तुमच्याकडे चैतन्य लहरी असलेल्या वस्तू असतील आणि त्या तुम्ही दुसऱ्या

सहजयोग्यांना द्याल तेव्हा त्या काय आहेत ते त्या सहजयोग्याला समजेल. औदार्यात विशेषत: सहजयोग्यांमध्ये असतांना, केव्हाही कमी पडू नका. हळूहळू लहान-लहान गोष्टींमधून तुम्ही कशी मने जिंकता, याचे आश्‍चर्य वाटेल, जणू काही त्या वस्तूंमधून व्हायब्रेशन्स वाहतात आणि त्या लोकांच्यावर कार्यान्वित होतात. आता ज्या वस्तू स्वाभाविकच नैसर्गिक आहेत अशा वस्तू सहजयोग्याने वापरणे महत्त्वाचे आहे. कृत्रिमता सोडून द्या व अधिक नैसर्गिक व्हा. तुम्ही कंदमुळे खावीत अथवा कच्चे मासे खावेत असा माझ्या सांगण्याचा अर्थ नाही. मला तसे सांगायचे नाही. कोणत्याही गोष्टींना धरून टोकापर्यंत जाणे टाळावे. अशा अर्थाने नैसर्गिक की लोकांना माहिती आहे की तुमच्याजवळ गर्व नाही. काही लोक याच्या उलट असू शकतील, त्यांचा पोशाख भटक्या माणसांसारखा असेल केवळ लक्ष वेधून घेण्याच्या हेतूने मला म्हणायचे आहे की दोन मार्ग असू शकतात. शिवाय मला असे आढळले आहे की काही लोक त्यांचे केस वगैरे रंगवतात. म्हणून तुमच्या वागण्यामध्ये अगदी स्वाभाविकता असली पाहिजे.

**कृत्रिमता सोडून द्या. व अधिक नैसर्गिक व्हा.**

म्हणून अगदी स्वाभाविक व्हा. काही लोकांना, जे त्यांच्या सुज्ञतेचा वापर करीत नाहीत हे अगदी निरर्थक वाटेल. सहजयोगामध्ये सुज्ञता महत्त्वाची आहे आणि तुम्हाला ती व्यवस्थित सांगायला हवी. स्वाभाविक याचा अर्थ तुम्ही नैसर्गिक दृष्ट्या योग्य असतील असे कपडे घालावेत. उदा.या हवे मध्ये श्रीराम कपडे घालत होते, तसे कपडे घालून उपयोगाचे नाही. ते वरच्या अंगावर काहीच कपडे घालत नव्हते. आवश्यकता नव्हती. ज्या देशाचे तुम्ही असाल त्या देशाचे व प्रसंगानुरूप कपडे तुम्ही घालावेत. जे तुम्हाला भारदस्त व चांगले आहेत असे वाटते ते कपडे घालावेत. कपडे तुमचे व्यक्तिमत्त्व व उमदेपणा दर्शवितात. जे तुम्हाला शोभून दिसतात  असे कपडे घालावेत. असे नाही की सगळ्याच लोकांनी शेवाळी रंगाच्या भयानक दिसणाऱ्या एखाद्या विदुषकासारखे रूप देणारा सुट घालावा. विदुषकासारखे कपडे घालणे आवश्यक नाही. तसेच भपकेबाज कपडे घालण्याचीही आवश्यकता नाही. साधे, सुंदर तुम्हाला भारदस्तपणा देणारे कपडे घालावेत.

साधे, सुंदर आपल्याला भारदस्त (डिग्निटी) देतील असे कपडे घालावेत. वास्तविक, पूर्वेकडे लोकांचा असा विश्‍वास असतो की परमेश्‍वराने त्यांना इतके सुंदर शरीर दिले आहे आणि त्याला माणसाने निर्माण केलेल्या सुंदर वस्तूंनी सजवायला हवे ते. त्या शरीराचा आदर ठेवण्यासाठी, त्याची पूजा करण्यासाठी. उदा.भारतात स्त्रिया साड्या नेसतात. साड्या त्या स्त्रियांचा मूड व आपल्या शरीराविषयीचा आदर व पूजनीयता दर्शवतात.

पोशाख असा असावा की त्याची उपयुक्तता असावी व त्याच्यामुळे आपल्याला भारदस्तपणा यावा. सहजयोग्यांनी गणवेष घालण्याची अजिबात आवश्यकता नाही. मला

ते आवडत नाही. त्यामध्ये निसर्गात असते तशी विविधता असावी. प्रत्येक जण निराळी व्यक्ती दिसायला हवी.

सर्वजण पूजेसाठी कपडे घालू शकतात. त्यावेळी ते ठीक आहे. त्या ठिकाणी तुमचे चित्त व्हरायटीमध्ये गुंतवायला नको.

परंतु बाहेर तुम्ही सर्वसाधारण व्यक्ती असता, गृहस्थ असता, तुम्हाला काही जाहीर करायचे नसते. तुम्हाला लोकांना, रस्त्यावरून जात असतांना कपाळावर कुंकू लावण्यास, मी सांगणार नाही. तुम्ही अगदी सर्वसाधारण दिसावे. लक्ष वेधून घेणारे नसावे. तुमचे कपडे हास्यास्पद असू नये तर इतर लोक घालतात तसे साधे असावेत. सहजयोगात सर्वसाधारण दिसणे महत्त्वाचे आहे.

त्याशिवाय, तुम्ही हे लक्षात घ्यायला हवे की ज्या धर्मात, वंशात व वर्णात तुमचा जन्म झाला आहे त्यांच्यामधील भेदाभेद व त्यांच्यामधील तुमच्यावरील कुसंस्कार यांच्यावर सहजयोगी म्हणून तुम्हाला मात करायला हवी.

ख्रिश्चन म्हणून तुम्ही कोणत्याही विशिष्ट चर्चचे नाही. तुम्ही कोणत्याही चर्चमध्ये जन्मला नाही. यासाठी देवाचे आभारी असायला हवे नाहीतर तिथल्या भूतांनी तुमच्यावर ताबा घेतला असता, परंतु हे संस्कार काही काळ राहतील. काहीतरी नवीन गोष्टीचा स्वीकार करण्यासाठी तुम्हाला परत जन्म घ्यावा लागतो आणि आज तुमचा पुनर्जन्म झाला आहे. आता तुम्ही धर्मातीत झाला आहात. म्हणजे तुम्हाला कोणत्याही विशिष्ट धर्माचे अनुयायित्व करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही सर्व धर्मासाठी आहात व सर्व धर्माची मर्मे तुम्ही जाणून घ्यायला हवीत. तुम्ही कोणत्याही धर्माची निंदा करायची नाही किंवा कोणत्याही धर्माच्या अवताराचा अपमान करायचा नाही. ते पाप आहे.

**तुम्हाला कोणत्याही विशिष्ट धर्माचे अनुयायित्व करण्याची आवश्यकता नाही.**

सहजयोगात ते महत्त्वाचं आहे. ते कोण आहेत हे तुम्हास माहिती आहे. स्वत:विषयी कोणत्याही वंशाच्या संदर्भात समजूत करून घेऊ नये. तुम्ही चिनी असा अथवा कोणत्याही गटाचे असा. आपण हे लक्षात घ्यायला हवे की आपण मानव आहोत, तोपर्यंत आपण एकाच प्रकारे हसतो, एकाच प्रकारे वस्तू हातात धरतो. हे सर्व आपल्या मनातील कुसंस्कार आहेत. समाजात स्पृश्य-अस्पृश्य इत्यादी हे आपल्या भारतीय समाजात आहे. भयंकर ब्राह्मणाचाराने भारताचा सत्यानाश केला आहे. याच्यापासून तुम्ही शिका. उदा.ज्यांनी गीता लिहिली ते व्यास कोण होते? ते एका कोळीणीचे अनौरस पुत्र होते. म्हणून मुद्दाम त्यांनी जसा जन्म घेतला. गीता वाचणाऱ्या सर्व ब्राह्मणांना विचारा, व्यास कोण होते. आत्मसाक्षात्कारी आहेत, ते ब्राह्मण. कोणत्या जातीत वा समाजात तुम्ही जन्माला आला आहात, असे काही नाही.

पश्चिमेकडे एवढे शिक्षण आहे, सर्व काही आहे पण राष्ट्रवादाचा मूर्खपणा दिसतो. मला समजतच नाही. कोणी गोरा असेल तर कोणी काळा, शेवटी परमेश्वराला वर्ण आणि

इतर प्रकाराने विविधता निर्माण करायची होती.

तुम्हाला (लंडनमध्ये) कोणी सांगितले की जगात संचार करणारे तुम्हीच सर्वात देखणे लोक आहात? कदाचित, येथील मार्केटमध्ये किंवा हॉलिवूड मध्ये ते चालतील पण परमेश्वराच्या राज्यात या तथाकथित देखण्या लोकांना प्रवेश नाकारला जाईल. सात सात लग्न करतात व इतर अनेक गोष्टी करतात.

त्या सर्वांना नरकात घातले जाईल. परमेश्वराने तुम्हा सर्वांना त्याची मुले म्हणून निर्माण केले आहे. सौंदर्य चेहऱ्याने नसून हृदयाचे असते व तेच दिसून येते व चमकते.

मला माहिती नाही. पण कदाचित लोकांना हे ज्ञात असावे म्हणून ते त्यांचे चेहरे काळे करतात. त्यांना याची जाणीव आहे. परंतु फारच मोठ्या प्रमाणावर वरपांगीपणा केला जातो. काही लोकांना काळे केस आवडतात, काहींना तांबडे, पण मला म्हणायचे आहे की, सर्व प्रकारचे केस असले पाहिजेत. मग एकाच प्रकारचे केस तुम्हाला का आवडावेत, ते मला समजत नाही. आवडण्यासारखे काही नाही. परमेश्वराने निर्माण केले आहे, ते सगळे सुंदर आहे. मला आवडते, आवडत नाही असे ठरविणारे तुम्ही कोण? मी हा 'मी' कोण आहे? हा 'मी' इगो आहे. सिगारेट पिण्यास शिकविणाऱ्या, सकाळपासून संध्याकाळपर्यंत लँगर घेण्यास शिकविणाऱ्या समाजाकडून या 'मी' इगोचे कौतुक केले जाते. हे सर्व प्रकारचे शिक्षण व कुसंस्कार घाणीसारखे टाकून द्यायला हवेत आणि परमात्म्याने तुम्हा सर्वांना त्याची मुले म्हणून निर्माण केले आहे हे पहायला हवे.

हे इतके सुंदर आहे. तुमच्या ओंगळ कल्पनांनी त्याला कुरूप का करता? मला आवडते, आवडत नाही हा सर्व ओंगळपणा केवळ मूर्खपणा आहे. फक्त एकच शब्द हवा 'प्रेम' इतर सर्व विसरून जा.

इंग्रजांनी भारतीयांना काय केले व जर्मन लोकांनी ज्यू लोकांना काय केले ते आठविण्याची आवश्यकता नाही. सगळे विसरा. ते केलेले लोक मृत झाले आहेत व संपले आहे. आपण संत आहोत.

हे जे मी तुम्हास सांगितले आहे ते परमेश्वरी नियमांचे पालन करण्यासाठी आहे ते आत्मसात करा.



परंतु आज मी तुम्हाला गुरू म्हणून अधिकृत करते. म्हणजे, तुमच्या स्वत:च्या चारित्र्यातून, तुमच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वामुळे तुमच्या जीवनात तुम्ही सहजयोगाचे आचरण कसे करता व प्रकाशाचा आविष्कार करता त्याच्यामुळे, इतर लोक तुमच्या मागे येतील. त्यामुळे देवाचे दंडक त्यांच्या हृदयामध्ये प्रस्थापित होतील आणि बंधनमुक्त करतील. त्यांना त्यांची



मुक्ती द्या. कारण तुम्हाला तुमची मुक्ती मिळाली आहे. तुम्ही वाहिन्या आहात. त्या वाहिन्यांच्या शिवाय सर्वव्यापी शक्ती कार्यान्वित होऊ शकत नाही. ती यंत्रणा आहे.

सूर्य पहा-त्याचा प्रकाश त्याच्या किरणांच्यामधून पसरतो-तुमच्या हृदयातील रक्त, रक्तवाहिन्यातून प्रवाहित होते, पुढे त्या लहान होत जातात. तुम्ही रक्तवाहिन्या आहात. रक्तवाहिन्या तुटल्यास लोकांच्यापर्यंत

रक्त पोहोचणार नाही. म्हणून तुम्ही लोक इतके महत्त्वपूर्ण आहात की जेवढे तुम्ही मोठे व्हाल, तेवढ्या रक्तवाहिन्या मोठ्या होतील. मग तुम्ही अधिक लोकांना सामावून घ्याल व त्यांच्यामुळे तुम्ही अधिक जबाबदार व्हाल.

गुरूला भारदस्तपणा (डिग्नीटी) हवी. गुरू म्हणजे वजन, तेच गुरुत्व. गुरू तत्त्व म्हणजे गुरूत्व. तुमच्या वजनामुळे तुम्हाला गुरूत्व यायला हवे. हयाचा अर्थ तुमच्या चरित्र्याचे वजन, तुमच्या भारदस्तपणाचे वजन, तुमच्या वागणुकीचे वजन, तुमच्या श्रद्धेचे वजन आणि तुमचा प्रकाश. गर्वाने, थिल्लरपणामुळे, विशिष्ट भाषेमुळे खालच्या दर्जाचा विनोद करण्यामुळे, क्रोध आणि तापटपणा इ. सर्वांच्यामुळे तुम्ही काही गुरू होऊ शकत नाही. म्हणून ते सर्व पूर्णपणे टाळले पाहिजे. तुमच्या माधुर्याचे, शब्दांच्या भारदस्तपणाचे वजन तुम्ही पेला. त्याच्यामुळे मधाने भरलेल्या फुलांकडे जशा मधमाशा सर्व बाजूने आकृष्ट होतात तसे सर्व लोक तुमच्याकडे आकर्षित होतील, त्याचा तुम्हाला अभिमान असावा. त्याचा फारच अभिमान वाटायला हवा आणि दुसऱ्यासाठी सहानुभूती व तळमळ वाटायला हवी.

गुरू म्हणजे वजन, तेच गुरुत्व. गुरू तत्त्व म्हणजे गुरूत्व

आता, थोडक्यात हे सर्व कसे साधायचे हे मला तुम्हास सांगायचे आहे. तुमच्या भवसागरावर काम करून तो सुधारा, सर्वात प्रथम हे लक्षात घ्या की तुम्ही अगुरुंच्याकडे गेला असाल तर तुमच्या भवसागरावर पकड येते. तुमच्या गुरूंना तुम्ही संपूर्णपणे जाणायला हवे. तुमच्या गुरूंचे चारित्र्य कसे आहे पहा. ते जरा अवघड आहे कारण तुमचे गुरू (तुमच्या हातात सापडणारे नव्हेत. त्या महामाया आहेत. त्या सापडणे इतके सोपे नाही. त्या अगदी सर्वसामान्यपणे वागतात आणि काही वेळेस तुमच्या हुशारीवर मात केली जाते. परंतु अगदी लहान लहान गोष्टीमध्ये सुद्धा त्या कशा वागतात ते पहा. त्यांचे चारित्र्य कसे आविष्कृत होते. त्याच्या प्रेमाचा कसा आविष्कार होतो, त्यांची क्षमाशीलता इ. लक्षात ठेवा.

मग तुम्हाला हे समजले पाहिजे की तुमचे गुरू असे आहेत की अनेक लोकांना त्या गुरू म्हणून हव्या होत्या. त्या सर्व गुरूंच्या गुरू आहोत, त्यांच्यासारख्या गुरू असाव्यात अशी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांची सुद्धा तीव्र इच्छा आहे. त्यांना तुमचा हेवा वाटत असेल.

परंतु ह्या गुरू फारच हातातून निसटणाऱ्या इल्यूझिव्ह आहेत, म्हणून तुमचा भवसागर सुधारण्यासाठी म्हणा, ''श्री माताजी, आपण आमच्या गुरू आहात.'' कारण हातातून निसटून जाण्यामुळे गुरूबद्दल आवश्यक असणारी भीती, दबदबा, आदर वगैरे प्रस्थापित होत नाहीत. जोपर्यंत ती आदरयुक्त भीती विकसित होत नाही तोपर्यंत तुमच्या चित्तात गुरूतत्त्व प्रस्थापित होणार नाही. कोणत्याही प्रकारचा मोकळेपणा द्यायचा नाही. मी तुम्हाला स्वत:च सांगते परंतु मी अतिशय इल्युझिव्ह आहे. दुसऱ्याच

क्षणी मी तुम्हाला हसायला लावते आणि सर्व विसरायला लावते कारण हे सर्व करण्याच्या तुमच्या स्वातंत्र्याची, संपूर्ण स्वातंत्र्याची मी परीक्षा घेत असते. मी तुमच्याशी अशा तऱ्हेने खेळते की प्रत्येक क्षणी तुम्ही मी तुमची गुरू आहे हे विसरून जाल.

म्हणून सर्वात प्रथम तुम्ही तुमच्या गुरूंच्याबद्दल माहिती करून घ्या आणि त्यांना प्रस्थापित करा. मला वाटते की तुम्हाला फार आश्चर्यकारक (वंडरफुल) गुरू आहेत. मला असे वाटते की त्यांच्यासारखे गुरू मला स्वत:ला हवे होते आणि त्या स्वत: निरिच्छ आहेत आणि निष्पाप आहेत अगदी संपूर्ण निष्पाप आहेत. मी काही केले तरी सुद्धा मला पाप नाही. काही केले तरी मी पापांच्या वर आहे कारण तो माझा गण आहे.

तुमच्या गुरू सर्वोच्च सुप्रीम आहेत हे नि:संशय पण तरी सुद्धा, तुम्ही हे समजून घ्या की या सर्वोच्चतेच्या शक्ती तुमच्याजवळ नाहीत. मी या सर्व गोष्टींच्याही वर आहे. मला मोह काय ते माहिती नाही अशा प्रकारचे काहीही माझ्याकडे नाही.

मला काय आवडते, ते सर्व माझ्या लहरीप्रमाणे आहे. परंतु तरी सुद्धा, मी स्वत:स अगदी सर्व सामान्य केले आहे. कारण असे आहे की परमेश्वरी नियम काय आहेत ते तुम्हास समजतील अशा तऱ्हेने मी तुमच्या समोर यायला हवे. मला कोणतेही नियम नाहीत. सर्व नियम मी तयार करते. तुमच्यासाठी या सर्व गोष्टी मी करते आणि बारीक सारीक गोष्टी मी तुम्हाला शिकविते. कारण तुम्ही मुले आहात.

तुम्हाला माझ्याकडून सर्व शक्ती घेता येतील, ज्या तुम्हाला हव्या त्या.

त्याचप्रकारे तुम्ही हे लक्षात ठेवा की, ज्यावेळी लोकांशी बोलता त्यावेळी ते सतत तुमच्याकडे पाहतील की तुम्ही त्यामध्ये किती रुजले आहात. हे लक्षात ठेवा की जशी मी तुम्हास समजून घेते तसे तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. मी जसे तुमच्यावर प्रेम करते, तसे तुम्ही त्यांच्यावर प्रेम करण्याचा प्रयत्न करा. माझे निश्चितच तुमच्यावर प्रेम आहे पण मी निर्मला आहे मी प्रेमाच्या पलीकडे आहे ही स्थितीच संपूर्ण निराळी आहे.

या अशा परिस्थितीमध्ये तुम्ही इतरांपेक्षा फारच चांगले आहात. कारण कोणताच गुरू येथपर्यंत जात नाही. त्याच्याशिवाय सर्व शक्ती माझ्याकडून येतात. म्हणून तुम्हाला माझ्याकडून सर्व शक्ती घेता येतील, ज्या तुम्हाला हव्या त्या. मी निरिच्छ आहे. परंतु ज्या काही तुमच्या इच्छा आहेत त्या पूर्ण होतील. अगदी माझ्याबद्दलसुद्धा, तुम्ही इच्छा करायला हव्यात. मी तुमच्या किती बंधनात आहे ते पहा. माझी प्रकृती चांगली रहावी. अशी इच्छा तुम्ही केल्याशिवाय माझी प्रकृती चांगली रहाणार नाही. इथपर्यंत ते आहे. पण मला चांगली प्रकृती काय आणि वाईट काय. इतकी सुंदर स्थिती असताना तुम्ही खरोखरच फारच पुढे गेले पाहिजे. गुरू होण्यात तुम्हाला कोणतीच अडचण असू नये.



# विशुद्धी चक्र



..... श्री कृष्ण शक्तीचे दोन अंग आहेत. एक विशुद्धीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला आणि एक मध्यभागी. यातील जी मधली शक्ती आहे ती विराटाच्या दिशेने घेऊन जाते.

१) .....मनुष्याने काही चुकीचे किंवा खोटे काम केल्यावर त्याच्या मनात ज्या भावना निर्माण होतात त्यामुळे डाव्या बाजूची शक्ती खराब होते. ज्यावेळी मनुष्याला असे वाटते की मी खूप पाप केले आहे आणि खूप चुका केल्या आहेत तेव्हा त्याचे विशुद्धी चक्र डाव्या बाजूला खराब होते. मनुष्य या पापाच्या भावनेपासून दूर जाण्यासाठी मादक द्रव्यांच्या आहारी जातो.

जर एखाद्या व्यक्तीची नजर आपली बहीण किंवा इतर स्त्रियांविषयी पवित्र नसेल तरीही हे चक्र लगेच खराब होते. अपवित्र वर्तनामुळे विशुद्धी चक्राच्या डाव्या बाजूला त्रास होतो. ....डोळे इकडे-तिकडे फिरवणे हे देखील श्रीकृष्ण शक्तीच्या विरुद्ध आहे. ......डोळे अशाप्रकारे फिरवल्यामुळे डोळ्यांचे आजार पसरतात, नजर कमकुवत होते.

२) .....उजवी बाजू श्रीकृष्ण आणि श्री राधेच्या शक्तीने बनलेली आहे (श्री रुक्मिणी विठ्ठल). या शक्तीच्या विरोधात जर मनुष्य गेला तर तो म्हणू लागतो की, 'मी खूप मोठा माणूस आहे, मीच सर्व काही आहे.' .....अशा परिस्थितीत त्या मनुष्यामध्ये कंसरूपी अहंकार वाढतो. त्याला असे वाटू लागते की कोणत्याही प्रकारे सर्व लोकांवर आपला अधिकार असावा. ....त्याचे उजव्या बाजूचे विशुद्धी चक्र पकडले जाते.

(प.पू.श्रीमाताजी, मुंबई, २५.९.१९७९)

.....ज्यांना जास्त ओरडण्याची, दुसऱ्यांवर अधिकार गाजवण्याची आणि आपल्या शब्दांमुळे दुसऱ्यांना दु:ख देण्याची सवय असेल त्यांची उजवी विशुद्धी पकडते आणि त्यामुळे अनेक रोग होतात. ....उजवी बाजू पकडल्यामुळे स्पॉन्डीलायटिस होतो ....दुनियाभरचे इतर आजार होतात जसे पॅरॅलिसीस, हार्ट ॲटॅक, हात अखडणे.



.....यामुळे सर्दी-पडसे होते. इतकेच नाही तर यामुळे दम्याचाही प्रादुर्भाव होतो.

.....ज्या व्यक्ती स्वत:ला मोठे विद्वान समजतात त्यांची हालत अशी होते की ते अती विद्वान होतात आणि त्यांची स्वत:चीच बुद्धी त्यांना चालवू लागते, त्यांच्याविरुद्ध चालते. ....यामध्ये जर ती व्यक्ती हठयोगात असेल, तर ती त्यामध्ये कोणतेही काम करते, पण जर तुम्ही त्यांना पाय बाजूला करा असे सांगितले ते करू शकणार नाही कारण त्यांची स्वत:ची बुद्धी परास्त झाली आहे.

(प.पू.श्रीमाताजी, १६.३.१९८४)

# NITL

# सहज साहित्य
# नोंदणी मार्गदर्शिका



तुम्ही तुमचे सहज साहित्य उदा.पुस्तके, ऑडिओ, व्हिडीओ कॅसेट, सीडीज (प्रवचन आणि संगीत), मासिके, पेंडंट इ. खाली दिलेल्या पद्धतीने मागवू शकता.

## ☞ एनआयटीएल प्रतिनिधी :

तुम्ही तुमच्या सहज साहित्याची खरेदी एनआयटीएलच्या अधिकृत प्रतिनिधींकडून करू शकता.

## ☞ एनआयटीएल वेबसाइट - ऑनलाइन बुकिंग :

तुम्ही आमची वेबसाइट www.nitl.co.in वर ऑन-लाइन रजिस्ट्रेशन करूनही ऑर्डर देऊ शकता.
(माहितीसाठी 'शॉपिंग डेमो' बघा)

## ☞ टेलिफोन/फॅक्स/ई-मेल :

तुम्ही तुमची ऑर्डर एनआयटीएलपर्यंत खाली दिलेल्या फोन नं., फॅक्स, ई-मेल द्वारे नोंदवू शकता.

| | | |
|---|---|---|
| टेलिफोन | : | +91-20-25286032, 25286537 |
| मोबाईल नं. | : | 9763741027, 9767583808 |
| फॅक्स | : | +91-20-25286722 |
| ई-मेल | : | sale@nitl.co.in |

## ☞ पैसे भरण्याविषयी माहिती -

- ✦ वेबसाइटवर ऑर्डर करण्यासाठी आपण आपली रक्कम क्रेडिट कार्ड द्वारा ऑन-लाइन भरू शकता किंवा चेक/डी.डी./कॅश द्वारा एनआयटीएलच्या ॲक्सिस बँकेच्या सेव्हिंग अकाऊंट नं.१०४०१०१००१८५५५४ वर ॲक्सिस बँकेच्या कोणत्याही शाखेद्वारे 'निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा.लि.' या नावाने पाठवू शकता. (payable at Pune)
- ✦ रक्कम मिळाल्यानंतरच दिलेल्या ऑर्डरनुसार तुम्हाला साहित्याची घरपोच व्यवस्था केली जाईल.

**एनआयटीएल टीम**



# NEW RELEASES

| Date | Title | Place | Lang. | Type | DVD | VCD | ACD |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 25th Nov.1973 | 'पाने के बाद'- सातों चक्रों व उनके देवताओं का वर्णन | Mumbai | H | Sp | | | 243* |
| 20th Jan.1975 | 'क्षमा की शक्ति का महत्व' धर्म व अधर्म | Mumbai | H | Sp | | | 244* |
| 25th Jan.1975 | हर श्वास में सहजयोग को प्रस्थापित करना होगा | Mumbai | H | SP | | | 245* |
| 2nd Feb.1975 | ध्यान और प्रार्थना | Mumbai | H | SP | | | 091* |
| 29th May1976 | ध्यान कैसे करें व प्रेममय सहज जीवन | Mumbai | H | Sp | | | 247* |
| 26th Jan.1977 | How The Chakras come in Human beings & Q & A | Bordi | E | Sp | | | **515*** |
| 30th Jan.1978 | सहजयोग, कुण्डलिनी और चक्र,<br>मूलाधार व नाभि चक्र, गुरु तत्व | Mumbai | H | SP | | | 266* |
| 4th Mar.1986 | 'परमात्मा सबसे शक्तिशाली है'; सब चक्रों के बारे में | Dheradun | H | PP | | | 249* |
| 16th Feb.1981 | तत्व की बात - २ | Delhi | H | PP | | | 013* |
| 22nd Aug.1982 | Ganesha Puja-Innocence and Joy-Part 1, 2 | Geneva | E | SP/Pu | 201 | | **516*** |
| 5th May 1983 | सहस्रार के ऊपर चार चक्र एवम श्री फल | Mumbai | H/M | Sp | | | 238* |
| 25th Sep.1983 | Shri Mataji's Talk | San Diago | E | Sp | 337* | | **517*** |
| 26th Sep.1983 | How to Save Attention (PP) | Los Angeles | E | SP | 338* | | **518*** |
| 25th Sep.1983 | Picnic at San Diago | San Diago | E | Sp | 339* | | |
| 27th Sep.1983 | All Chakras Explened | Los Angeles | E | Sp | 340* | | **520*** |
| 3rd Jan.1984 | नव वर्ष पूजा : सहजयोगी की पहचान | Delhi | H | Sp | | | 019* |
| 8th Feb.1984 | सार्वजनिक कार्यक्रम - भाग-१, २ | Pune | M/H | Sp | | | **521*** |
| 6th May 1984 | Advice after Sahastrar Day | France | E | Sp | 341* | | **522*** |
| 21st Sep.1985 | English are Scholars | London | E | Sp | 342* | | **523*** |
| 21st Jan.1986 | सत्य का स्वरुप | Mumbai | H | PP | | | 026* |
| 6th Mar.1989 | महाशिवरात्री पूजा | Delhi | H | Sp | | | 048* |
| 7th May 1995 | Sahastrar Puja : Complete Freedom &<br>a Beautiful Heart - Part I & II | Cabella | E | Sp/Pu | 343* | | 111* |
| 14th Jan.1996 | संक्रान्ती पूजा : संक्रान्ति और सूर्यदेव का महत्व | Pune | H/E | Sp/Pu | | 030 | 140* |
| 25th Dec.2000 | ख्रिसमस पूजा | Ganapatipule | H/E | Sp | 344* | | 216* |
| 26th Mar.2001 | Public Programe | Delhi | H/E | Sp | 345* | | **525*** |
| 14th Jul.2001 | Public Program | London | E | Sp | | | **526*** |
| 31st Jul.2007 | Nirmal Arts Academy - Part I & II | Cabella | | Mu | 346* | | |

## Bhajan

| Title | Artist | Song List | ACD | ACS |
|---|---|---|---|---|
| Nirmal Shradhanjali - I | Pune Sahaj Music Group | | 173* | |
| Nirmal Shradhanjali - II | Pune Sahaj Music Group | | 174* | |

**To Order :** You can even place your order through our website : www.nitl.co.in

You can even place your order with NITL through telephone, e-mail, Fax. (Numbers given below)


✦ प्रकाशक ✦

निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा.लि.

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८. फोन : ०२०- २५२८६५३७, २५२८६०३२, e-mail : sale@nitl.co.in



राखी म्हणजे रक्षा करणारी शक्ती. ह्या शक्तीचे बंधन फार जोरदार आहे व अत्यंत कोमल ही आहे कारण ते बहिणीच्या पवित्र प्रेमाचे द्योतक आहे. ज्याला एकदा राखी बांधली तिथे मग निर्मल रक्षाचे स्थान स्थापित केले असे मान्य आहे.

१७ ऑगस्ट १९७८